लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

कंट्रक्शन
आमच्याकडे कमर्शियल रेसिडेंशियल बंगलोज अपार्टमेंट दर १६५० चौ. फुटप्रमाणे मटेरियलसह लॉक अँड की प्रोजेक्ट करून दिले जातील. संकल्प इंजीनियर्स
मो. ९३७१५२३९३९

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ३० वा | शनिवार, दि. १७ ऑगस्ट २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

कामिनी गांधी
संस्था, फॅशन डिझायनिंग
सरकारमान्य सर्टिफिकेट
गारमेंट मॅन्यु. अँड फॅशन डिझायनिंग - फर्स्ट ईयर
फॅशन डिझायनिंग अँड फॅशन टेक्नॉलॉजी - सेकंड ईअर
कॉम्प्युटराईज्ड फॅशन डिझायनिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी - थर्ड ईअर
▸ फॅशन ड्रेस डिझायनिंग
▸ फॅशन ब्लाऊज डिझायनिंग ▸ प्रिंसेस ब्लाऊज ▸ अरी वर्क ▸ पार्टिवेअर गाऊन
एका वर्षात कुटुंबातील कमवता सदस्य व्हा.
या... पहा.. शिका..!
२६३, दक्षिण कसबा, युनिक हॉस्पिटल समोर, जुनी फौजदार चावडी, सोलापूर
9850117867, 9096495025

# महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुका लांबणीवर !

## विरोधकांचा अंदाज खरा ठरला ?



मुंबई (कटूसत्य वृत्त):- महाराष्ट्र विधानसभेची मुदत येत्या २६ नोव्हेंबरला संपणार आहे. अशातच राज्यातील विधानसभा निवडणुका ऑक्टोबरला पार पडतील असा अंदाज बांधण्यात आला होता. परंतु निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद पार पडली. निवडणुक आयोगाने महाराष्ट्र निवडणुकाचं वेळापत्रक मात्र जाहीर केले नाही. झारखंड आणि महाराष्ट्र या दोन राज्यातील निवडणुका जम्मू काश्मीर आणि हरियाणा राज्यातील निवडणुका पार पडल्यावर होतील असे निवडणूक आयोगाने पत्रकार परिषदेत स्पष्ट सांगितले आहे.

झारखंड विधानसभेची मुदत ४ जानेवारी २०२५ पर्यंत आहे तर महाराष्ट्राची २६ नोव्हेंबरपर्यंत आहे.२०१९ मध्ये हरियाणा आणि महाराष्ट्रात एकाच वेळी निवडणुका पार पडल्या होत्या. यंदा मात्र दोन्ही राज्यात वेगवेगळ्या निवडणुका पार पडणार आहे. दिवाळीआधी राज्यात निवडणुका पार पडतील असा अंदाज राजकीय तज्ज्ञांकडून मांडण्यात येत होता मात्र आता दिवाळीनंतर निवडणुका पार पडतील असे स्पष्ट संकेत निवडणूक आयोगानेच दिले आहेत.

महाराष्ट्राच्या निवडणुकाची तारीख जाहीर न करण्यामागे काही राजकीय कारण आहे का ? असा सवाल विचारण्यात आला. यावर निवडणूक आयोगाचे मुख्य आयुक्त राजीव कुमार म्हणाले, प्रश्न विचारणे सोपे आहे आरोप करणे सोपे आहे असे म्हणाले, पुढे त्यांनी उत्तर दिले. महाराष्ट्रात पाऊस असल्या कारणाने निवडणूक आयोगाचे बरेचसे काम राज्यात बाकी राहिले आहे. तसेच महाराष्ट्रात पुढील (पान 2 वर..)

After 10th & 12th
Hotel Management
BOOK YOUR SEAT NOW
Limited Seats...Hurry
Diploma - Govt Approved Two Year Course
Degree - UGC Approved Three Year Course
ADMISSION STARTED 2024-25
Be All rounder
Be Executive Chef,
Be General Manager,
Be Executive Engineer,
Be Account Manager
Be Best Bar Tender
Be F & B Manager
with Only One Course
100% JOB Guaranty
Earn & Learn
• With 2+ Years Experience
• Earn 10000+ Per Month
• Education loan @ 0 %
• Scholarship for Boys/Girls
• Foreign Languages
• 100+ Practicals
• Visits/Five Star Hotels/Wineries
INDEX
★★★★★
College of Hotel Management
Visit
Prime Point building , beside bharat petrol pump, shewalwadi phata, hadapsar, pune -411037
Web-www.iindexhospitality.com
9970667166, 9970669566



## विधानसभा निवडणुकीसाठी २२ हजार कर्मचारी

### शिक्षकांसह सर्वच शासकीय कार्यालयाकडून मागविली यादी



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने आता प्रशासनाची तयारी सुरू झाली आहे. सध्या मतदार यादी अंतिम करण्याची कार्यवाही सुरू असून १५ सप्टेंबरदरम्यान आचारसंहिता जाहीर होवू शकते. या पार्श्वभूमीवर निवडणुकीसाठी आवश्यक मनुष्यबळाची माहिती संकलित केली जात आहे. साधारणतः २२ हजार कर्मचारी विधानसभेसाठी लागणार असून त्यांची यादी सर्वच शासकीय कार्यालयांकडून मागविण्यात आली आहे.

जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघात आता एकूण तीन हजार ७२२ मतदान केंद्रे असणार आहेत. गतवर्षीच्या तुलनेत यंदा १२३ केंद्रांची वाढ झाली आहे. निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी शहरी भागात एक हजार ३५० मतदारांसाठी एक तर ग्रामीण भागात चौदाशे मतदारांसाठी एक केंद्र असणार आहे. दरम्यान, (पान 2 वर..)

## सोलापूरची सूत्रे पुन्हा मोहिते पाटील यांच्याकडे



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर आणि माढा लोकसभा मतदारसंघांतील विजयानंतर सोलापूर जिल्ह्यात शरद पवार, विजयसिंह मोहिते-पाटील आणि सुशीलकुमार शिंदे या तिघा ज्येष्ठ नेत्यांचे सूत पुन्हा जुळले आहे. यातच जिल्ह्यातील राष्ट्रवादी शरद पवार गटाची संपूर्ण सूत्रे मोहिते-पाटील कुटुंबीयांकडे सोपविण्यात आली असून जिल्ह्यातील विधानसभेच्या उमेदवारांची निवड मोहिते-पाटील यांच्याच सल्ल्यानेच होणार असल्याचे स्पष्ट संकेत खासदार सुप्रिया सुळे यांनी दिले आहेत.

त्यातून केवळ स्वपक्षाच्याच नाहीत तर महाविकास आघाडीच्या सर्व अकरा जागा जिंकून देण्याचा चंग बांधत मोहिते-पाटील कुटुंबीय सक्रिय झाले आहेत.

राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या शिव स्वराज्य यात्रेसाठी सोलापुरात आलेले प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी तर मोहिते-पाटील कुटुंबीयांविषयी जाहीरपणे कृतज्ञता व्यक्त केली. तर खासदार (पान 2 वर..)

स्वातंत्र्य सेनानी संदिपान दादा गायकवाड बहुउद्देशिय व संशोधन संस्था
संचलित
मोहोळ शहरातील पहिली आधुनिक अभ्यासिका
* वैशिष्ट्ये *
• वातानुकूलित सुसज्ज इमारत व प्रसन्न वातावरण
• मुलां-मुलींसाठी स्वतंत्र बसण्याची व्यवस्था
• आरामदायी बैठक, डेस्क लॅम्प
• प्रदुषणमुक्त वातावरण
• स्वतंत्र प्रसाधनगृह
• वेळोवेळी तज्ञांचे योग्य मार्गदर्शन
• शुध्द पिण्याच्या पाण्याची व्यवस्था
• दर्जेदार दैनिक वर्तमान पत्रे, मासिके इ. मोफत उपलब्ध
• प्रत्येक जागा आरक्षित
• मर्यादित प्रवेश क्षमता
• वाहन तळाची सोय
• दि. १६ ऑगस्ट २०२४ पासून आपल्या सेवेत
• लॅपटॉप व मोबाईल चार्जिंगसाठी स्वतंत्र पॉईंट
• अभ्यासिकेत नोंदणी करणाऱ्या प्रथम १० विद्यार्थ्यांना शुल्कात १०% सूट
• संपर्कासाठी पत्ता •
बी.एन. गुंड कॉम्प्लेक्स, सोलापूर रस्ता, मोहोळ, ता. मोहोळ, जि. सोलापूर.
अभ्यासिकेची वेळ : स. ९.०० ते रात्री ९.०० पर्यंत
मो. नं. 7038864753 / 9226517873

|| भावपुर्ण श्रध्दांजली ||
प्रथम पुण्यस्मरण



कै. अभिजित भाऊ गायकवाड
मृत्यू दिनांक : २९/०८/२०२३
मायेची गेली सावली ! करुणेचा हरवला सागर !!
उरली नाही साथ आम्हाला ! आठवण येते क्षणाक्षणाला !!
शोकाकुल :
मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित, मोहोळ
शोकाकुल : चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित, मोहोळ

## संपादकीय


# सूड भावनेचा कहर

राजकीय सूड भावनेचा कहर किती हीन पातळीवर जाऊ शकतो याचे मूर्तिमंत उदाहरण दिल्लीतील राज्य सरकारच्या बाबतीत पाहायला मिळत आहे. तिथे आम आदमी पक्षाच्या सरकारच्या मंत्र्याला 15 ऑगस्टच्या मुख्य कार्यक्रमात अधिकृतपणे तिरंगा ध्वजही फडकावण्यास मनाई केली गेली आहे. मनाला अतिशय वेदना देण्याच्या पातळीवर भाजप आणि आम आदमी पक्षातील ही कटुता पोहोचली आहे. सगळ्यांनाच ठाऊक आहे की दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल सध्या कारागृहात आहेत. त्यामुळे येत्या स्वातंत्र्यदिनी आपल्या सरकारमधील मंत्री आतिशी यांच्या हस्ते मुख्य शासकीय कार्यक्रमात ध्वजारोहण केले जावे अशी केजरीवालांची एक साधी सूचनाही धुडकावली गेली आहे. कारागृहात असलेल्या मुख्यमंत्र्याला अशी सूचना करण्याचा अधिकार नाही अशी भूमिका घेत तेथील नायब राज्यपालांच्या कार्यालयाने आणि नायब राज्यपालांच्या तालावर नाचणाया दिल्ली सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने ही सूचना धुडकावून लावली आहे. मुळात आपण कारागृहात आहोत त्यामुळे आपल्या हस्ते तिथे ध्वजारोहण होणार नाही, ही अडचण लक्षात घेऊन केजरीवालांनी नायब राज्यपालांना पत्र पाठवून आपल्या ज्येष्ठ मंत्री आतिशी यांच्या हस्ते हा कार्यक्रम व्हावा अशी सूचना केली होती. सुरुवातीला नायब राज्यपालांच्या कार्यालयाने केजरीवालांचे असे पत्रच आपल्याला मिळाले नसल्याची भूमिका घेतली. त्यानंतर काही प्रसारमाध्यमांमधून केजरीवालांनी हे पत्र पाठवल्याची बाब उघड झाल्यानंतर, वरून अचानक सूत्रे फिरली आणि तिहार कारागृहाच्या अधिकार्यांना कामाला लावले गेले. कारागृहाच्या अधिकार्यांनी केजरीवालांनाच याप्रकरणी तंबी दिली असून त्यांनी म्हटले आहे की 'तुम्ही कारागृहातून नायब राज्यपालांना असे पत्र पाठवू शकत नाही, असा प्रकार पुन्हा घडला तर मुख्यमंत्री म्हणून तुम्हाला जे विशेषाधिकार देण्यात आले आहेत ते काढून घेतले जातील.' आपल्या पत्राला किंमत मिळत नाही हे पाहून केजरीवालांनी आपल्या सरकारमधील सामान्य प्रशासन विभागाचे मंत्री गोपाल राय यांना कारागृहातील भेटीत आतिशी यांच्या हस्ते ध्वजारोहण व्हावे अशी सूचना केली. त्यानुसार राय यांनी सामान्य प्रशासन विभागाच्या प्रमुखांना तशी सूचना करणारे पत्र धाडले. परंतु त्यावरही कुरघोडी केली गेली. सामान्य प्रशासन विभागाचे कोणी एक चौधरी नावाचे अतिरिक्त मुख्य सचिव आहेत, त्यांनी आपल्या विभागाच्या मंत्र्यांचीच ही सूचना धुडकावून लावत आतिशी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्याची सरकारची सूचना ग्राह्य धरता येणार नाही, असे स्पष्ट केले आहे. खरे पाहता हा किती सामान्य मुद्दा आहे. किमान स्वातंत्र्यदिनाचा सोहळा तरी राजकीय कुरघोड्यांपासून मुक्त राहायला हवा होता. मुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत राज्यातील महत्त्वाच्या व ज्येष्ठ मंत्री आतिशी यांच्या हस्ते हे ध्वजारोहण झाले असते तर कोणाचे काय बिघडले असते? पण राजकीय सूडापोटी केजरीवालांची ही साधी सूचनाही धुडकावली गेली. दिल्लीत प्रचंड बहुमताने तिर्सयांदा सत्तेवर आलेल्या आम आदमी पक्षाची जितकी कोंडी करता येईल तितकी कोंडी करण्याचे काम सध्या सुरू आहे. मुळात या सरकारचे सर्व अधिकारच काढून घेण्यात आले आहेत. त्यांना त्यांच्या मतानुसार आज साध्या शिपायाचीही बदली करण्याचा अधिकार उरलेला नाही. दिल्ली सरकारची सर्व विधेयके आणि फायली नायब राज्यपालांकडून अडवून ठेवल्या जात आहेत. दिल्ली सरकारला कायद्याने केंद्राकडून जो निधी मिळणे अपेक्षित असते तो निधीचा अधिकारही त्यांना नाकारला गेला आहे. त्यांचे सारे मंत्री आणि नेते कारागृहात डांबले गेले आहेत. त्यांच्या सर्व लोकप्रिय ठरलेल्या योजनांना आडकाठी आणली गेली आहे. एवढेच नव्हे तर आम आदमी पक्ष हा आज एक अधिकृत राष्ट्रीय पक्ष असताना त्यांना राष्ट्रीय पक्ष म्हणूनही केंद्राकडून मान दिला जात नाही. नुकतीच केंद्र सरकारने बांगलादेशातील घडामोडींच्या संबंधात देशातील सर्व राजकीय पक्षांच्या नेत्यांची एक बैठक बोलावली होती. त्या बैठकीलाही आम आदमी पक्षाला निमंत्रण नव्हते. वास्तविक राष्ट्रीय पक्ष म्हणून त्यांच्या प्रतिनिधीला या बैठकीसाठी निमंत्रण देणे क्रमप्राप्त होते. आम आदमी पक्षाची दिल्ली महापालिकेत सत्ता आहे. तिथे त्यांना नव्या महापौर निवडीसाठी अनुमती दिली जात नाही. त्या महापालिकेच्या स्थायी समिती नियुक्त करण्याच्या कामातही अडथळे आणले गेले आहेत. या सर्व बाबी बातम्यांद्वारे लोकांपर्यंत नियमितपणे पोहोचत असतात. टीव्ही माध्यमांतून आम आदमी पक्षाच्या सरकारच्या विरोधात केंद्राकडून ज्या कुरघोड्या सुरू आहेत त्याच्या बातम्या प्रसिद्ध होत नाहीत. पण वृत्तपत्रांतील बातम्यांमधून या घडामोडी लोकांना समजत असतात. आज चारही बाजूने या आम आदमी पक्षाला अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन नामोहरम केले जात आहे ही बाब वेदनादायी आहे. हा विषय आम आदमी पक्षाची बाजू घेण्यासाठी म्हणून उपस्थित करण्यात आलेला नाही, हा मुद्दा लक्षात घेण्याची गरज आहे. राजकीय कुरघोडी करण्यासाठी एखाद्या लोकनियुक्त सरकारची जी गळचेपी सुरू आहे त्यातून त्या राज्यातील जनताच भरडली जात आहे ही बाब प्रामुख्याने लक्षात घेण्याची गरज आहे. आम आदमी पक्षाच्या राजकारणाविषयी तुम्हाला राजकीय आक्षेप असू शकतात. पण त्याच्या विरोधात लढण्यासाठी रास्त वैधानिक अधिकार केंद्रातील सत्ताधारी पक्षाला आहेत. त्याचा वापर न करता सर्रास केंद्रीय सत्तेचा दुरूपयोग करून दिल्ली सरकारची कोंडी सुरू आहे, ती मान्य करता येणार नाही. तुमच्या राजकीय द्वेषाचे परिणाम दिल्लीतील जनतेने का भोगायचे हा यातला प्रमुख मुद्दा. आज या सगळ्या कुरघोड्यांचा स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणाच्या बाबतीत कडेलोट झाला आहे. आतिशी या महिला मंत्री आहेत. आज त्या मोठ्या हिकमतीने केजरीवाल, सिसोदिया यांच्या अनुपस्थितीत दिल्ली सरकारचा कारभार हाकत आहेत. दिल्ली सरकारची अनेक मंत्रालये त्या एकहाती सांभाळत आहेत. त्यामुळे आज त्या दिल्ली सरकारच्या सीनियर मंत्री ठरत असताना मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या अनुपस्थितीत त्यांना ध्वजारोहण करण्यास अनुमती दिल्याने काय आकाश कोसळणार आहे हे समजत नाही. राजकारणात राजकीय कुरघोड्या अपेक्षितच असतात, पण त्याची इतकी हीन पातळी वेदनादायी आहे, हे मात्र निश्चित.

# नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कथित विमान अपघाताचा पर्दाफाश

# “नेताजींचा मृत्यू विमान अपघातामध्ये झालाच नाही !”

**सुभाष सिक्रेट पुस्तकामध्ये लेखक क्रांती महाजन यांचा दावा**






महाराष्ट्राच्या अमरावती शहरातील सांस्कृतिक भूमीत जन्मलेल्या क्रांती महाजन या युवकाने सुवर्णकाळ म्हटल्या जाणारे आयुष्याचे संपूर्ण तिसरे दशक राष्ट्रीय विचारधारेस समरस होवून घालविले. समकालीन युवकांना आदर्श ठरावे असे 'क्रांतीचे कमळ' चिखलात उगविणे तेवढे नाविण्याचे नाही. अक्षरशः दोन तपाचा कालखंड आयुष्याच्या अगदी उमेदीच्या काळात नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवन व मृत्यूविषयक अध्ययनावर खर्ची घालून आज 'सुभाष सिक्रेट' या आगळ्या वेगळ्या पुस्तकाची निर्मिती क्रांती महाजन या महाराष्ट्रातील युवकाने केली अन पश्चिम बंगाल राज्यासह संपूर्ण भारत देशाने त्या पुस्तकाची दखल घेतली. प्रारंभी प्रचंड विरोध झाला असतांनाही आज बघता-बघता 'सुभाष सिक्रेट' या पुस्तकाच्या बावीस आवृत्ती प्रकाशित झाल्या आहेत. प्रत्यक्ष महाराष्ट्र राज्याच्या राजभवन येथे 'सुभाष सिक्रेट' पुस्तकाचे प्रकाशन झाले आहे. या पुस्तकाने वाचक संख्येचे सर्व उच्चांक मोडले आहेत. एकाच वेळी मराठी, हिंदी व इंग्रजी भाषांसह जगातील इतरही काही भाषांमध्ये प्रकाशित होत असलेले ' सुभाष सिक्रेट ' हे पुस्तक अमरावती नगरीतून जगाच्या व्यासपीठावर जाणे, ही बाब सबंध महाराष्ट्राच्या अस्मितेला उंचाविणारी ठरते. खुद्द नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आशियाई देशांमध्ये आणि सिंगापूरच्या ज्या कॅथे हॉल मध्ये आझाद हिंद सेनेची स्थापना करणारी घोषणा केली होती , त्याच आशियाई देशांमध्ये व सिंगापूरच्या कैथे हॉलमध्ये 'सुभाष सिक्रेट' च्या इंग्रजी आवृत्तीचे प्रकाशन सुनियोजित आहे. मराठी मातीचा गंध दूरवर नेवू पाहणाऱ्या ' सुभाष सिक्रेट ' या पुस्तकाच्या क्रांती महाजन या लेखकाला प्रेरणा अन प्रोत्साहन मिळावी म्हणून 'सुभाष सिक्रेट' या पुस्तकातील काही भाग नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या कथित विमान अपघाताच्या दिनविशेष (18 ऑगस्ट) पार्श्वभूमीवर जागरूक विचारांच्या भारतीय नागरिकांना व सर्वसामान्य वाचकाला कळावा, याकरीता वाचकांसमोर मांडला आहे.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यात अनेक राष्ट्रभक्त पुढे आलेत. त्यांनी अपार कष्ट सोसले. सरकारी राग ओढावून घेतल्यामुळे त्यांना कारावासातही जावे लागले. हे सर्वमान्य आहे की, नेताजी सुभाषचंद्र बोस हे अतिशय लोकप्रिय काँग्रेसवादी नेता होते आणि म्हणूनच सन १९३९ च्या त्रिपुरा येथील अधिवेशनात सुभाषचंद्र बोस यांनी पट्टाभिसितारमय्या यांच्यावर खुद्द महात्मा गांधींचा पाठिंबा असतांनादेखील जबरदस्त मात केली होती. नेहरु आणि गांधी घराण्याला प्रचंड हादरा देवून गेलेले नेताजी सुभाषचंद्र बोस हे शतकातले एकमेव व्यक्तीमत्व होते, असे म्हणणे अतिशयोक्ती ठरणार नाही.

नेताजी सुभाषचंद्र बोस हे माझ्या जीवनातले एक अतीव आदराचे आणि श्रध्देचे स्थान आहे. भारताच्या इतिहासात छत्रपती शिवाजी महाराजानंतर एवढा धाडसी आणि पराक्रमी महापुरुष दुसरा झालेला नाही, असे माझे अढळ मत आहे. या वीर पुरुषाला महात्मा गांधी आणि पंडित नेहरु यांनी दुर्लक्ष करून भारताच्या राजकीय जीवनातून उठवून लावण्याची पराकाष्ठा केली, हा दुर्दैवी इतिहास जगजाहीर आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळवून द्यायचे वास्तविक श्रेय देशाबाहेर राहून तडफदार कार्य करणारे सुभाषबाबू ह्यांना द्यावयास हवे. पण काँग्रेसने तसे न करता आपल्या पक्षीय स्वाथार्साठी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील सन्माननीय नेताजींची भूमिका व दि. १८ ऑगस्ट, १९४५ ची विमान दुर्घटना संशयास्पद , अस्थिर स्वरुपाची व वैचारिकतः संशोधनास गरजेची वाटत असतांनाही तत्कालीन पंडित नेहरु सरकराने शहानवाज चौकशी आयोगासारखी समिती स्थापन करुन पुन्हा एकदा भारतीय जनतेला दिशाभूल करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला असल्याचे आढळते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा दिनांक १८ ऑगस्ट, १९४५ रोजी तैहोकू येथील विमान अपघात व नेताजीचा 'कथित' मृत्यू आजवर एक कोडेच बनून आहे. हे कोडे सोडविण्याचा अनेकांकडून प्रयत्न करण्यात आला व आज पुन्हा त्याच संदर्भात नेताजीच्या 'कथित' अस्थिकलशाच्या अनुषंगाने हा डोंगर पोखरून काढण्याची नव्याने गरज निर्माण झाली आहे. कारण अलिकडील दिवसांत भारताचे पंताधान श्री. नरेंद्र मोदी यांनी सत्तर वर्षाच्या प्रदीर्घ कालखंडानंतर प्रथमतःच नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या संशयास्पद मृत्यू प्रकरणासंदर्भातील काही महत्वाच्या फाईल्स भारतीय जनतेसमोर उघड केल्या, हे जरी सत्य असले तरी रशियाच्या केजीबी या गुप्तचर संघटनेजवळ नेताजींसंदर्भात अद्यापही असलेल्या ३६ अति गुप्त फाईलाचे रहस्य गुलदस्त्यातच आहे. पंतप्रधान श्री. गरेंद्र मोदी यांनी उघड केलेल्या कागदपत्रांची या संदर्भात भारतीय नागरिकांसमोर स्पष्ट झालेली माहिती यापूर्वीच 'सुभाष सिक्रेट' पुस्तकाच्या प्रथम आवृतीमध्ये नमूद करण्यात आली होती व त्या आवृत्तीच्या पंधरा वर्षामध्ये बावीस आवृत्यांचे प्रकाशन घडून आले आहे. भारताचे विविध राज्यपाल व केंद्रीय मंत्री यांनी पुरस्कृत केलेले तसेच थायलंड येथील आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये प्रकाशित झालेले 'सुभाष सिक्रेट' हे पुस्तक पश्चिम बंगाल सरकारने व भारत सरकारने कागदपत्रे उघड केल्यानंतर नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मृत्यु संदभार्तील रहस्याचा पदार्फाश करणारे भारतातील पहिले पुस्तक ठरते.

येणेप्रमाणे सरकारच्या उघड केलेल्या दस्तावेज (फाईलींमध्ये) असणारी माहिती येथे समोर येणे तेवढेच गरजेचे आहे. ती माहिती अशी –

(1) या फाईली १९३८ ते १९४७ दरम्यानच्या आहेत. नेताजी सुभाषचंद्र बोस आणि त्यांचे भाऊ शरदचंद्र बोस यांनी एकमेकांना लिहिलेली पत्रेही या फाईलीमध्ये असल्याचे सांगितले जात आहे.

(2) एका विमान अपघातामध्ये १९४५ मध्ये नेताजींचा मृत्यू झाला होता, असा दावा केला जातो. मात्र आता १९४७ पर्यंतच्या फाईली समोर येत असल्यामुळे नवे प्रश्न उपस्थित झाले आहेत.

(3) नेताजी जीवंत आहे, असे माझे अंतःर्मन सांगत आहे, अशी भावना महात्मा गांधीजींनी व्यक्त केली होती. १९४६ मधील एका फाईलमध्ये ही माहिती दिली गेली आहे.

(4) आपण रशियात आहोत आणि भारतात परतायचे आहे, अशा आशयाचे सुभाषबाबूंचे एक पत्र पंडित नेहरुंना मिळाले होते. असे या फाईलीमध्ये म्हटले असल्यामुळे गांधीजींचे वक्तव्य त्याच काळातले असल्याचे मानले जात आहे.

(5) एका इंग्रजी वृत्तपत्राने केलेल्या दाव्यानुसार या फाईलींमध्ये असे काही पुरावे आहेत, ज्यामध्ये १९६० च्या दशकात तयार करण्यात आलेला अमेरिकेचा एक अहवालही आहे. त्यातील माहितीनुसार नेताजी सुभाषचंद्र बोस हे फेब्रुवारी १९६४ मध्ये भारतात परतले होते.

(6) वर्ष १९४८-४९ मध्ये ब्रिटन आणि अमेरिकेच्या गुप्तचर संघटना नेताजी जीवंत असल्याचे मानत होत्या, असे काही कागदपत्रांत म्हटले आहे. नेताजींनी दक्षिण-पूर्व आशियातील अनेक डाव्या चळवळीत महत्वाची भूमिका बजावली होती, असे त्यांचे म्हणणे होते.

येथे आपण लक्षात घ्यावे की, नेताजी सुभाषचंद्र बोस हे दिनांक १८ ऑगस्ट, १९४५ रोजी फामोर्सा बेटातील तैहांकू येथे विमान अपघातात जखमी होवून मरण पावले, असे त्यावेळी जपान सरकारकडून प्रसिध्द करण्यात आले होते. पण आश्यर्याची गोष्ट अशी की, या विमान अपघाताची किंवा नेताजींच्या मृत्यूची अधिकृत चौकशी आजवर कोणीच केली नाही. त्यावेळी तर भारत सरकारतर्फे जवाहरलाल नेहरूंची भूमिका उदासिन होती, हे विशेष. तरी सुध्दा भारत सरकारने औपचारिकतेच्या कर्मकांडातून दिनांक ५ एप्रिल , १९५६ रोजी नेताजी चौकशी समितीची (नंबर एफ ३० - २६ BRY.B.EA. /५५) नेमणूक केली . समितीचे चेअरमन म्हणून शहनवाझ खान होते. सरकारचे दुसरे प्रतिनिधी म्हणून एस. एन. मेत्र होते. श्री सुरेशचंद्र बोस हे एकमेव बिनसरकारी प्रतिनिधी त्या समितीवर होते. शहनवाझ खान हा नेताजींचा समर्थक कधीच नव्हता, तो काँग्रेसकर्त्या नेहरूंचा हस्तक होता. नेहरु हे सुभाषचंद्राचे कट्टर राजकीय विरोधक होते . तेव्हा सुभाषचंद्र बोस मृत्यूसंदर्भात कायमचा पूर्णविराम द्यायचा दृष्टीकोन विमान आपघातानंतर तब्बल अकरा वर्षांनी समिती नेमून तिच्या तोंडून नेताजी बोस अपघातात मरण पावलेत, हे नेहरुंनी वदवून घेतले. याला नेहरुंच्या पांढऱ्या प्रतिमेवरचा काळा डाग म्हणावा लागेल. ज्या तैहोकू (फार्मोसा) बेटात विमान अपघात झाला त्या बेटाच्या चौकशीप्रसंगी शहनवाझ खान कमिटीवरचे एक सभासद होते, पण त्यांनी त्या कमिटीच्या अहवालात सही केली नाही. ह्या सर्व गोष्टी काय दर्शवितात? नेताजींची राख एवढा त्यांचा मृत्युचा पुरावा शहनवाझ कमिटीला मिळाला. भारत सरकारने उच्च पातळीवरुन नेमलेल्या एका जबाबदार समितीने नेताजींच्या मृत्यूचा असा हास्यास्पद नि पोरकट पुरावा द्यावा, ह्या गोष्टीची तिला खरोखरच लाज वाटायला हवी. सारांश, शहनवाझ कमिटीच्या रिपोर्टवरुन नेताजी विमान अपघातात मरण पावले, ही गोष्ट सिध्द होत नसतांना संबंधित सरकारच्या परंपरागत उदासिनतेच्या अलिप्त धोरणाने हिंदवासीयांची विद्वता, जिज्ञासा जाहीर व्हावी, ह्याच एका उद्देशापोटी 'सुभाष सिक्रेट' या पुस्तकाचे प्रयोजन केल्या गेले आहे.

### 'सुभाष सिक्रेट' मधील महत्वपूर्ण मुद्दे –

(1) ज्या विमानतळावर नेताजींचे विमान कोसळले असे सांगितले जाते तिथे दिनांक १८ ऑगस्ट, १९४५ रोजी कुठलाही अपघात झाल्याची नोंदच नाही, असे आढळले आहे.

(2) भाजलेल्या नेताजींवर उपचार करणारे डॉ. योशिनी यांनी अलीकडेच सांगितले की , एका हिंदी अधिकाऱ्याने

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या मृत्यूचे प्रमाणपत्र तयार करण्याची सक्ती त्यांच्यावर केली. तो हिंदी अधिकारी कोण?

(3) एक तर विमान अपघात झालाच नव्हता, आणि दिनांक १८ ऑगस्ट, १९४५ रोजी नेताजी हे फामार्सामधील तेहोकूतसुध्दा नव्हते. खरी वस्तुस्थिती अशी होती की, नेताजी हे दक्षिण व्हिएतनामची राजधानी सायगाव येथून अदृश्य झाले होते .

(4) नेताजींची समोर न येण्याचे हेही एक कारण आहे की, दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर आंतरराष्ट्रीय निबंर्धानुसार त्यांना 'युद्ध अपराधी' ठरविण्यात आले होते. दिनांक १८ ऑगस्ट , १९४५ रोजी ब्रिटनच्या ९ पार्लमेंटमध्ये तत्कालीन पंतप्रधान मिस्टर ॲटली यांनी एका प्रश्नाला उत्तर देतांना असे म्हटले होते की, 'हिंदुस्थानच्या पुढाऱ्यांशी ठरल्याप्रमाणे जेंव्हा केव्हाही सुभाषबाबू दिसतील तेंव्हा त्यांना ब्रिटनच्या हाती हिंदुस्थानने सोपविले पाहिजे. ' याचा लेखी आधार वाचकांना ( Transfer of Power Vol.6, 1942 - 1947 ) या खंडात पाहायला मिळेल. स्वातंत्र्यानंतर यावर विचार का केला गेला नाही?

(5) नेहरू सरकारने 'कथित' विमान अपघातानंतर अकरा वर्षांनी आणि दिनांक ५ मार्च, १९५२ रोजी लोकसभेत 'नेताजी मरण पावले आहेत व त्याची काही चौकशी केली जाणार नाही' असे सांगितल्यानंतर ४ वर्षांनी सन १९५६ मध्ये 'शहनाज-तपास-समिती' का बरे नेमली? आणि वर्ष १९४५ मध्ये दुसरे जागतिक महायुद्ध संपल्यानंतर टोकियोमधील न्यायालयाचे एक न्यायाधिश डॉ. राधाविनोद पाल यांच्याऐवजी जनरल शहानवाज खान यांनाच तपास समितीचे अध्यक्ष म्हणून का बरे नेमले होते?.

(6) जपानच्या रैंकोजी मंदिरातील नेताजींच्या 'कथित' अस्थि या मुळात नेताजी बोस यांच्या नसून द्वितीय महायुद्धातील 'इचिरो ओकुरा' नामक जपानी सैनिकाच्या आहेत. तसे नसल्यास भारत सरकार नेताजी बोस यांच्या अस्थिकलशाची डि.एन.ए. चाचणी का करीत नाही?

(7) विमानाच्या अपघाताचे आणि त्यानंतर नेताजींच्या 'राखे'चे फोटो प्रसिध्द झाले आहेत, तो त्यांच्या मृत्यूचा पुरावा होऊ शकतो काय? नेताजीच्या 'प्रेता' चा फोटो कोणीच कसा घेतला नाही ? हा फोटो का घेण्यात आलेला नाही ?

(8) जगातील प्रथम दर्जाची गुप्तचर संघटना म्हणून ख्याती असलेल्या अमेरिकेच्या 'सीआयए' या गुप्तचर संस्थेने तर नेताजी बोस हे केवळ जीवंतच नाही तर ते भारतात असल्याचा दावा वर्ष १९६४ साली केला होता व अलिकडेच वर्ष २००२ मध्ये नेताजी बोस हे १०५ वर्षाचे झाले असल्याचा दावा 'सीआयए' या अमेरिकेच्या गुप्तचर संस्थेने केला असल्याचे वृत्त आहे.

(9) भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या निधनानंतर त्यांच्या पार्थिवाला श्रध्दांजली अर्पण करण्यासाठी दिनांक २८ मे, १९६४ रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस हे स्वतः त्रिमूर्ती भवन, नवी दिल्ली येथे बौद्ध भिक्कुच्या वेषात आले होते. स्वतः लालबहादूर शास्त्री त्यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस यांना विशेष अतिथी मार्गाने त्रिमुर्ती भवनात पंडित नेहरुंच्या पार्थिवाजवळ घेवून आले होते. त्या संबंधीचे दृश्य भारत सरकारच्या डॉक्यूमेंट्री फिल्म विभागाच्या वतीने त्रिमूर्ती भवनाच्या आतील चित्रीकरणाच्या (फिल्म डिव्हीजन क्र. ८१६ बी) या अंतिम भागात पाहावयास मिळेल. सदरचे चित्रिकरण आज माझ्याजवळ उपलब्ध आहे. त्या चित्रिकरणाचे रहस्य काय?

(10) कोलकाताच्या एशिएन्टिक सोसायटीचे काही लोक मॉस्कोमध्ये काही सरकारी कागदपत्रे पाहत होते . तेव्हा त्यांना वर्ष १९४६ मधील काही कागदपत्रे मिळाली. त्यात स्टॅलीन व मोलोटोव यांच्यातली वर्ष १९४६ मधील चर्चा होती. त्यात सुभाषचंद्र बोस रशियात राहतील की, दुसरीकडे निघून जातील यावर बोलणे चालले होते. रशियनांकडे नेताजीसंबंधीचे कागदपत्रे आहेत. भारत सरकार ती मागत का नाही?

(11) भारताच्या राष्ट्रपतींनी आपल्या राष्ट्रपतींच्या अधिकारात नेताजीच्या मृत्युचे वृत्त आकाशवाणी व दूरचित्रवाणीवरुन राष्ट्राला घोषित करून सांगावे व आदरपूर्वक नेताजींचा स्मृतिदिन जाहीर करावा.

(12) अत्यंत वस्तुनिष्ठ आणि तर्कशुध्द भूमिकेतून विचार केल्यास नेताजी सुभाषचंद्र बोस हे दिनांक १८ ऑगस्ट , १९४५ रोजी 'कथित' विमान अपघातात मरण पावले, असे म्हटल्या जाते. याउलट तैहोकू विमानतळावरच्या अपघातात नेताजींचा मृत्यू झाला अशी खात्री पटली आहे , त्यांनी जपान येथील टोकियोतल्या रेनकोजी मंदिरात जपून ठेवलेल्या अस्थि किमान भारतात आणण्यासाठी सरकारकडे आग्रह धरला पाहिजे. भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी जपानला जाऊन आल्यानंतरदेखील हा विषय दुर्लक्षित रहावा, ही देखील एक शोकांतिकाचं !

रेणकोजी मंदिरातला अस्थिकलश भारतात आणण्याबाबत इंफाळचे जयचंद्रसिंग यांनी तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना नेताजींच्या अस्थि भारतात आणण्याबद्दल पत्र पाठविले होते. त्यानंतर दिनांक २६ सप्टेंबर, १९८५ रोजी डॉ. शिशिरकुमार बोस यांनी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींना पत्र पाठवून नेताजींच्या दृष्टीने सबंध राष्ट्रच त्यांचे कुटुंब असल्याने नेताजीच्या मृत्यू प्रकरणाचा प्रश्न हा राष्ट्रीय कर्तव्याचा व राष्ट्रीय स्वरुपाचा प्रश्न ठरतो. तेव्हा भारत सरकारने त्या संदर्भात योग्य ती पावले उचलावीत अशी सूचना दिली होती.

त्यानंतर दिनांक 1 डिसेंबर, 1995 रोजी भारत सरकारने नेताजींच्या मृत्यूप्रकरणी सत्यता उघड करण्यासाठी प्रयत्न करुन वास्तविक कारणांचा नव्याने लावण्यासाठी चौकशी आयोग स्थापन करावा, अशी मागणी भाजपाचे श्री. विष्णुकांत शास्त्री व फॉरवर्ड ब्लॉकचे श्री. जयंतो यांनी दिल्लीत राज्यसभेत केली असून 'कथित' जपान येथील अस्थिकलश नेताजींचा असल्याच्या विदेशमंत्र्यांच्या निवेदनाने आपण असमाधानी असल्याचे नमूद आहे.

सदर अस्थिकलशास अनुसरून तर माजी संसद सदस्य प्रो. समर गुहा यांनी आपल्या 'नेताजी डेड ऑर अलाइव' या पुस्तकात सरकार दुसऱ्याच्याच अस्थिकलशास नेताजींच्या अस्थि संबोधित करीत असून भारतीयांची फसवणूक करीत असल्याचा खळबळजनक आरोप केला आहे. तसेच नेताजींच्या अनुयायांनी व आझाद हिंद फौजेतल्या सैनिकांनी 1989 मध्ये एक समिती स्थापन करून जपानचा अस्थिकलश भारतात आणण्याची मागणी पंतप्रधान राजीव गांधी यांना केली होती. अगदी याचं संदर्भात नेताजींचे फॉरवर्ड ब्लॉक मधील सहकारी एन. जी. रंगा, शीलभद्र याजी, नेताजींचे पुतणे डॉ. शिशिरकुमार बोस, कर्नल प्रेमकुमार सहगल , कॅप्टन लक्ष्मी सहगल, कर्नल गुलबक्षसिंग धील्ला यांनी ही मागणी उचलून धरली होती.

अगदी याचं संदर्भात मी स्वतः दिनांक 17 जानेवारी , 1996 रोजी तत्कालीन पंतप्रधान श्री. नरसिंहराव यांना पत्र पाठवून नेताजींचा 'कथित' अस्थिकलश भारतात आणून ब्रिटिश फॉरेन्सिस सायन्स सर्व्हिसेसच्या दाव्यानुसार नेताजींचे भाचे वा पुतणे यांच्या रक्ताच्या साहाय्याने अस्थिकलशातील राखेची डी. एन. ए. चाचणी करण्याची मागणी केली होती . आजवर विविध सरकारने नेताजींच्या संदर्भात अनेक तपास आयोग स्थापन केले आहेत . मात्र त्याचं तपासाचा एक भाग म्हणून जपानचा अस्थिकलश भारतात का आणत नाही?, हा एक प्रश्नच आहे.

(13) नेताजींच्या कन्या डॉ. अनिता बोस जेव्हा सर्वप्रथम जर्मनीहून भारतात आल्या असतील तेव्हा भारत सरकारच्या परराष्ट्र मंत्रालयाने त्यांचे पारपत्र (पासपोर्ट) तपासले नव्हते का? जर तपासले असेल तर त्या पासपोर्टवर 'वडीलांचे नाव' या ठिकाणी काय लिहिले होते?. डॉ अनिता बोस ज्याअर्थी भारतात आल्या त्याआधीच त्यांच्या वडीलांचे नाव हे 'सुभाषचंद्र बोस' होते, याविषयी भारत सरकारला माहिती होती. मग ही माहिती उगीच का लपविण्यात आली ?

(14) हिमालयातील गुमनामी बाबा, शौलमारी आश्रामातील व्यक्ती, फैजाबादचे बाबा, इत्यादी विषयी भारतात एवढ्या चर्चा होतात. तरी भारत सरकारचे या बाबींकडे आजवर दुर्लक्ष राहिले. ते का?

(15) वर्ष 1948 – 49 मध्ये ब्रिटन आणि अमेरिकेच्या गुप्तचर संघटना नेताजी जीवंत असल्याचे मानत होत्या. नेताजींनी दक्षिण – पूर्व आशियातील अनेक डाव्या चळवळीत महत्वाची भूमिका बजावली होती, असे त्यांचे म्हणणे होते.

तात्पर्य असे की, 'सुभाष सिक्रेट ' मध्ये आधुनिक भारताच्या इतिहासाचा परामर्श घेतला आहे. आधुनिक कालखंडाच्या हिंदुस्थानाचं रसग्रहण त्यातून केल्या जावू शकते . येथे वाचकांनी लेखकाचा वास्तविक विषय लक्षात घेवूनच पुस्तक वाचले असावे, अशी माझी समजूत आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस म्हणजे हिंदुस्थानाच्या इतिहासातील एक झंझावात होय. 'समग्र नेताजी' हा विषय शब्दांत मांडता येणं कोणालाही शक्य झाले नाही. सामाजिक प्रगतीचे किंबहुना राष्ट्रीय विकासाचे सिद्धांत स्पष्ट करुन हिंदुस्थानाच्या आधुनिक कालखंडातील प्रश्नांचे विश्लेषण करतांना नेताजींची सुसूत्र, स्वतंत्र, स्वयंपूर्ण व स्वयंसिद्ध अशी संशोधनपर विचारसरणी या पुस्तकात उपयोगिली आहे, एवढेच.

एका जिज्ञासूवृत्तीने निर्माण झालेल्या प्रश्नापासून लेखकाच्या संशोधनाला प्रारंभ झाला. संशोधन हे काही हौसेचे कार्य नाही अथवा वेळ घालविण्याचे साधन नाही. ती पूर्ण वेळेने, निष्ठेने, त्यागाने, समर्पणाने केल्या जाणारी कृती होय. अल्पावधीकरीता स्वीकार करावी, अशी ती वृत्ती नाही. जिज्ञासा, सत्यनिष्ठा, निर्भयता, परिश्रमशीलता, चिकाटी, महत्त्वाकांक्षा, आत्मविश्वास हे सर्वच प्रकारच्या संशोधनासाठी आवश्यक असणारे गुणविशेष आहेत. ज्ञानोपसकाच्या भूमिकेवरुन संशोधनाची बौद्धीक प्रक्रिया पूर्ण करीत असतांना चौदा वर्षे नव्या तथ्याचा शोध आणि उपलब्ध तथ्याचे पुनरनुसंधान मी करीत गेलो. केवळ नेताजींचा 'कथित' विमान अपघात व त्यातील त्यांचे 'कथित' निधन एवढाच या पुस्तकाचा प्रतिपाद्य विषय मुळीच समजू नये. तसंही 'नेताजींचा मृत्यू' हा काही चघळण्याचा विषय नाहीय. त्यामुळे पुस्तक हाती घेताच थेट 'नेताजींचा मृत्यु कधी झाला?' या प्रश्नावर येणाऱ्या वाचकांनी थोडे या दिशेने जागरुक होणे गरजेचे आहे. वाचकाने पुस्तकाचे प्रमाणिक पठन केले असेल तर आपोआपच सर्व प्रश्नांची उत्तरं मिळू शकतात, याची मला खात्री आहे. लक्षात असू द्यावे की, कोणताही विषय समजण्यात त्याचे तथ्य वा घटना यांची मनुष्याला खरी अडचण नसते, तर त्या घटनांचा आकलोनत्तर निर्णय करण्याची कुवत असण्याचा अभाव हिच अडचण असते. हि अडचण झुगारुन हिंदुस्थानातील ज्या ज्या वाचकांनी कळत-नकळत 'सुभाष सिक्रेट' ची प्रत केवळ हाती जरी घेतली असेल, तरी मी त्यांचा शतशः ऋणी आहे.

# प्रभाकर वाचनालय तर्फे स्वातंत्र्य दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** शेळगी येथील सद्गुरु प्रभाकर महाराज वाचनालयात ग्रंथनिरीक्षक प्रमोद पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले अध्यक्ष स्थानी महादेव पाटील होते जयंत आराध्ये यांनी प्रास्ताविक केले याप्रसंगी अशोक खानापुरे प्रमोद पाटील बाबुराव नरुणे यांनी स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व सांगितले या प्रसंगी मन्मथ कोनापुरे शिवलिंग शाबादे बी. आर इंडे सुरेश तानवडे अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला वाचक सौ.संगीता आराध्ये, स्नेहलता हेडगीरे, गौरी वांगीकर, सौ.नंदा कुलै, सौ.साबळे व विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमानंतर सर्वांना खाऊ वाटप करण्यात आले.

पान १ वरून

## विधानसभा निवडणुकीसाठी...

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता जाहीर होण्यापूर्वी मतदानावेळी लागणाऱ्या मनुष्यबळाची यादी अंतिम केली जात आहे. आचारसंहिता जाहीर झाल्यानंतर लगेचच त्या सर्वांच्या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पार पडेल. त्यानंतर पुन्हा दोनवेळा प्रशिक्षण दिले जाणार आहे.

मतदान केंद्रांमध्ये वाढ झाल्याने या निवडणुकीत सर्वच खासगी अनुदानित व जिल्हा परिषदेसह महापालिकेच्या शाळांमधील शिक्षकांना इलेक्शन ड्यूटी करावी लागणार आहे. २०१९मध्ये २१ ऑक्टोबर रोजी एकाच टप्प्यात २८८ जागांसाठी मतदान झाले होते. पण, लोकसभा निवडणुकीवेळी पाच-सहा टप्पे करण्यात आले होते. त्यामुळे विधानसभा निवडणूक एकाच टप्प्यात होणार की दोनपेक्षा जास्त टप्प्यात होईल, याचा अंदाज राजकीय पक्षांकडून बांधला जात आहे.

## सोलापूरची सूत्रे पुन्हा मोहिते पाटील...

सुप्रिया सुळे यांनी त्यापुढे जाऊन माढा व सोलापूर लोकसभेच्या दोन्ही जागा जिंकून देत भाजपचे उच्चाटन करण्यात मोठा हातभार लावणाऱ्या मोहिते-पाटील कुटुंबीयांच्या सल्ल्यानेच जिल्ह्यातील विधानसभेसाठी उमेदवार निवडले जाणार असल्याचे स्पष्ट संकेत दिले आहेत. त्यामुळे आता जिल्ह्यातील राजकारणाची संपूर्ण सूत्रे पुन्हा मोहिते-पाटील यांच्या ताब्यात जाणार असल्याचे मानले जात आहे. पश्चिम महाराष्ट्रातील राजकारणाचा मागील ५० वर्षांचा वेध घेतला असता शरद पवार आणि विजयसिंह मोहिते-पाटील यांच्यात अधुनमधून ह्य घडलं-बिघडल्या ह्य चे चित्र दिसायचे. कधी सौहार्दपूर्ण दाट मैत्री, कधी शीतयुध्द तर कधी युध्दाचा उडालेला भडका आणि त्यातून टोकाला पेटलेल्या संघषार्चा महाराष्ट्राने पाहिला आहे. शरद पवार यांच्या सोबत असताना मोहिते-पाटील यांना उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा प्रमुख अडसर होता, असे बोलले जायचे. त्यातूनच मोदी लाट असताना मागील २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मोहिते-पाटील कुटुंबीयांनी शरद पवार यांची साथ सोडून थेट भाजपमध्ये जाणे पसंत केले होते. तेथे विजयसिंह मोहिते-पाटील यांचे पुत्र रणजितसिंह मोहिते-पाटील यांना विधान परिषदेवर सामावून घेण्यात आले होते. नंतर काही दिवसांतच त्या पक्षातही मोहिते-पाटील कुटुंबीयांची घुसमट होऊ लागली. त्याचे उदाहरण म्हणजे मागील विधानसभा निवडणुकीत भाजपने मोहिते-पाटील यांना अजिबात विश्वासात न घेता त्यांच्या घरच्या माळशिरस राखीव जागेवर संघ परिवारातील राम सातपुते यांना शेवटच्या क्षणी आयात करून त्यांच्या आमदारकीची सोपविलेली जबाबदारी. जे मोहिते-पाटील हे पूर्वी पश्चिम महाराष्ट्रात विधानसभेचे उमेदवार ठरविताना महत्वाचा अधिकार गाजवायचे, त्यांना स्वतःच्या माळशिरसमध्येही उमेदवार ठरविण्याचा अधिकार भाजपमध्ये राहिला नव्हता.

## वात्रटिका

### उघडा डोळे बघा नीट

घराघरात म्हणे त्यांनी
भांडणे लावली...
लावली तर लावली पण
तशी ती फायद्याची ठरली...
कोणाचे भाग्य उजळले
तर कोणाचे भाग्य उजाडले...
एकाच घरात कोणी खासदार
कोणी आमदार, मंत्री झाले...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

## किसन जाधव यांची अजित पवारांकडे आग्रही मागणी
## सोलापूर शहर मध्य विधानसभा राष्ट्रवादीला द्या

# शहर मध्य विधानसभा राष्ट्रवादीला देण्यासाठी अजित पवार सकारात्मक - किसन जाधव

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आगामी विधानसभा निवडणुकीत जास्तीत जास्त जागा निवडून आणून अजित पवार हे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री व्हावेत यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते हे नियोजन करीत आहेत.

याच पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हा नियोजन समितीचे विशेष निमंत्रित सदस्य किसन जाधव यांनी मुंबई येथील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी पक्षाचे सर्वेसर्वा अजित पवार यांची भेट घेतली त्या भेटीदरम्यान किसन जाधव यांनी अजित पवार यांच्याकडे आग्रही मागणी करीत सोलापूर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ हे राष्ट्रवादीच्या उमेदवारांनी लढवावी यासाठी ही जागा राष्ट्रवादीच्याच वाटेला घ्यावी अशी मागणी किसन जाधव यांनी अजित पवारांकडे केली. सोलापूर शहरातील तीन पैकी एक जागा राष्ट्रवादीला सुटेल असा विश्वास राष्ट्रवादीचे स्थानिक पदाधिकारी व्यक्त करत आहेत याच पार्श्वभूमीवर शहर मध्य विधानसभा मतदारसंघ ही राष्ट्रवादीला सुटण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच पार्श्वभूमीवर ही महत्त्वाची भेट आणि चर्चा झाली यावर अजित पवार यांनी सकारात्मक भूमिका घेत या संदर्भात योग्य निर्णय घेण्यात येईल असा विश्वास देखील या चर्चेदरम्यान किसन जाधव यांना अजित पवारांनी दिली. दरम्यान यावेळी किसन जाधव यांनी आगामी विधानसभा निवडणुकीच्या संदर्भात राष्ट्रवादीची संघटनात्मक पक्ष बांधणी करू, शहर मध्य विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादीचा उमेदवारांने निवडणूक लढवावी त्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उमेदवाराच्या विजयासाठी जोमाने कामाला लागतील असे देखील ते म्हणाले. नुकतेच राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून इच्छा भगवंताची मित्रपरिवार आणि प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव यांच्या वतीनं अजितोत्सव सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये शहर जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना मोफत नोंदणी शिबीर, 22 जुलै रोजी जन्मलेल्या नवजात बालकांच्या नांवे राष्ट्रीयकृत बँकेत पाच हजार रुपये फिक्स डिपॉझिट, क्षयरोग बाधितांना सहा महिन्याचे अन्नधान्य किट यासह विविध विकास कामांचे शुभारंभ आदी कार्यक्रमांचा समावेश होता.



यावेळी किसन जाधव यांनी अजितोत्सव चषक कबड्डी स्पर्धेचे सन्मान चिन्ह अजित पवार यांना देण्यात आले यावेळी विधान परिषदेचे नवनिर्वाचित आमदार शिवाजीराव गर्जे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सह कोषाध्यक्ष संजय बोर्गे, नगरसेवक नागेश गायकवाड, प्रदेश युवक सरचिटणीस चेतन नागेश गायकवाड, राष्ट्रवादी शहर संघटक माणिक कांबळे, माऊली जरग, महादेव राठोड यांच्यासह इच्छा भगवंताची मित्रपरिवारचे पदाधिकारी व सदस्य यांची उपस्थिती होती. आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणण्यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी जोमाने कामाला लागावे अशा सूचना देखील यावेळी अजित पवारांनी केली.

# जलशक्ती अभियानातून सोलापूर जिल्हा जलयुक्त करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत - राकेश कुमार मीना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्रीय जलशक्ती अभियानाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात जलसंधारणाचे विविध कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांनी अत्यंत कृतिशील आराखडा तयार करावा. ग्राम पातळीवरील सर्व यंत्रणा, शालेय विद्यार्थी, नागरिक व शेतकरी यांच्या पर्यंत या अभियानाचे महत्त्व पटवून द्यावे. प्रत्येक ठिकाणी जलसंधारणाची अत्यंत दर्जेदार कामे करून सोलापूर जिल्हा जलयुक्त करण्यासाठी सर्व यंत्रणांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन केंद्रीय जलशक्ती अभियानाचे नोडल अधिकारी राकेश कुमार मीना यांनी केले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात जलशक्ती अभियानाच्या अनुषंगाने आयोजित आढावा बैठकीत मीना मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा, कृषि उपसंचालक राजकुमार मोरे, जिल्हा परिषद जलसंधारण अधिकारी पारसे. एस. एस, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता नाईकवाडी, सोलापूर महानगर पालिकेचे डंके, उपशिक्षणाधिकारी प्राथमिक श्रीमती रुपाली भावसार यांच्यासह सर्व संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

नोडल अधिकारी मीना पुढे म्हणाले की, जलशक्ती अभियानांतर्गत सोलापूर जिल्ह्याच्या विविध भागात झालेल्या कामांची पाहणी केली. ही सर्व कामे अत्यंत चांगल्या पद्धतीने झालेली असून याच पद्धतीने जनशक्ती अभियानाअंतर्गत कृती आराखडा करत असताना कामे घ्यावीत. अमृत सरोवर योजनेअंतर्गत सोलापूर जिल्ह्यात झालेले काम खूप चांगले असून या अंतर्गत 75 पेक्षा अधिक सरोवरात दुरुस्ती करून त्याची पाणी साठवण क्षमता वाढवली तसेच ते सरोवर पुन्हा जिवंत करण्याचे काम जलसंधारण विभागाने केलेले आहे, हे अत्यंत कौतुकास्पद काम असल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात विविध ठिकाणी स्पॉट व्हिजिट करून जलसंधारणाचे कामे आराखड्यात घेत असताना ती तांत्रिकदृष्ट्या अत्यंत योग्य असली पाहिजेत याची खात्री करावी यासाठी जपानच्या तंत्रज्ञानाचा वापर करावा. या अभियानाच्या माध्यमातून सोलापूर जिल्ह्यात जलसंधारणाची मोठ्या प्रमाणावर कामे प्रस्तावित करून ती कामे अत्यंत चांगल्या पद्धतीने होण्यासाठी जलसंधारण विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांनी काटेकोरपणे नियोजन करावे व सोलापूर जिल्हा पाणीटंचाई मधून बाहेर पडून जलयुक्त जिल्हा होईल यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन मीना यांनी केले. तसेच या अभियानाचे अधिक गतिमान पद्धतीने अंमलबजावणी होण्यासाठी महिलांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर घ्यावा. व जलशक्ती से नारीशक्ती तक हे अभियानाचे असलेले ब्रीदवाक्य अगदी सार्थ ठरेल असे त्यांनी म्हटले.

यावेळी केंद्रीय तांत्रिक अधिकारी श्रीमती पुर्णिमा बाराहते यांनीही सोलापूर जिल्ह्यातील जलसंधारणाच्या विशेषतः अमृत सरोवर योजनेत झालेल्या कामाविषयी समाधान व्यक्त केले.

प्रारंभी जिल्हा जलसंधारण अधिकारी दयासागर दामा यांनी जिल्ह्यात जलसंधारण विभागाच्या विविध शाखा मार्फत करण्यात आलेल्या कामांची माहिती दिली. तर कृषी उपसंचालक राजकुमार मोरे यांनी कृषी विभागाच्या वतीने जलसंधारण मध्ये करण्यात येत असलेल्या कामांची माहिती विशद केली.

# जिल्हास्तरीय पथकाकडून मौजे शिराळा-टेंभुर्णी ता.माढा येथील अवैध वाळू उत्खननांवर कारवाई

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** गौण खनिजाच्या अवैध वाहतूक, उत्खनन व साठ्याच्या प्रकरणांत महाराष्ट्र जमीन महसूल संहिता 1960 मधील कलम 48 (7) नुसार गौण खनिजाच्या बाजार मुल्याच्या पाच टक्यांपर्यंत दंडाच्या रकमेची परिगणना करून नियमानुसार स्वामित्वधन व दंडाची रक्कम वसुल करण्याची, तसेच कलम 48 (८) नुसार अवैध उत्खननाकरीता वापरण्यात आलेली यंत्रसामुग्री व वाहतुकीकरिता वापरण्यात आलेली वाहने जप्त करण्याची तरतुद आहे. यानुसार सोलापूर जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन, वाहतूक व साठा प्रकरणांत कारवाई करण्याचे अनुषंगाने जिल्हा स्तरावर व तहसिल स्तरावर गठित करण्यात आले आहेत. जिल्हास्तरीय समितीमध्ये उपजिल्हाधिकारी, तहसीलदार व नायब तहसीलदार यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

जिल्हाधिकारी सोलापूर यांचे मार्गदर्शनानुसार दिनांक 13 ऑगस्ट 2024 रोजी जिल्हास्तरीय पथकाकडून मौजे शिराळा-टेंभुर्णी ता.माढा येथील अवैध वाळू उत्खनन चालू असल्याचे प्राप्त गोपनीय माहितीवरून त्या ठिकाणी कारवाई करण्यात आली आहे. या कारवाईमध्ये साधारण 131.9 ब्रास वाळू साठा जप्त करण्यात येऊन, संबंधित अवैध वाळू उत्खनन करून साठा करण्यावर तहसिलदार माढा यांचेस्तरावरून दंडात्मक कारवाई प्रस्तावित करण्यात आलेली आहे.

जिल्ह्यात अवैध गौण खनिजाच्या विविध प्रकरणांत एप्रिल 2024 ते जुलै 2024 अखेर पर्यंत केलेल्या कारवाईमध्ये अवैध वाहतूक व उत्खननच्या आढळून आलेल्या एकुण प्रकरणे 123 आहेत. सदर प्रकरणांत एकुण रक्कत रुपये 78.93 कोटी दंड आकारण्यात आलेला आहे. सदर दंडात्मक कारवाई व्यतीरिक्त फौजदारी कारवाईमध्ये वरील नमुद कालावधीत एकुण 28 गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. तसेच गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीच्या विविध प्रकरणांत वापर करण्यात आलेले एकुण 16 वाहने इतर 3 यंत्रसामग्री जप्त करण्यात आलेली आहेत

# नेताजी शिक्षण संकुलात स्वातंत्र्य दिन साजरा

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** श्रमजीवी नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस मराठी प्राथमिक शाळा, इंग्लिश मिडीयम स्कूल, माध्यमिक प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भारताचा ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य रविशंकर कुंभार होते. व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले, पालक-शिक्षक संघटनेचे उपाध्यक्षा लक्ष्मी चिलवेरी, सहसचिव बुडप्पा चिकनी, शालेय समितीचे उपाध्यक्षा उमा पगड्याल, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे आदी उपस्थित होते.



प्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले त्यानंतर पालक शिक्षक संघटनेच्या उपाध्यक्षा लक्ष्मी चिलवेरी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आला.

याप्रसंगी इयत्ता दहावी, बारावी, आय.टी.एस. व संगीत परीक्षेत विशेष यश संपादन केलेल्या राजराजेश्वरी संगीत विद्यालयचे विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. बालरोग तज्ञ डॉ.डी. पी नकाते यांच्यातर्फे विजयालक्ष्मी देगील, शिरीषा बोगा, नरसिम्म अन्नम या विद्यार्थ्यांनीना 'सौ. जनाई मेमोरियल पुरस्कार प्रदान करण्यात आला. माजी प्राचार्य विजयकुमार हुल्ले यांच्यातर्फे विजयालक्ष्मी देगील, कोमल मुचंडी, वैष्णवी सुंदूपटला, वैष्णवी घंटे लावण्या मिसालोलू, लहरीका गोने, ललिता रॅका, कावेरी पगड्याल, रक्षिता सुंकनपल्ली व इरेश अक्का या विद्यार्थ्यांना 'शिव-कला पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले. कै. मलप्पा धुमशेट्टी यांच्या स्मरणार्थ माजी प्राचार्य सुभाष धुमशेट्टी यांच्याकडून तसेच कै.बसवराज कुंभार यांच्या स्मरणार्थ मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार यांच्याकडून दहावीत प्रथम आलेल्या विजयालक्ष्मी देगीलला रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला तसेच शिवानंद पुजारी यांच्याकडून 'श्री महासिद्ध विद्या प्रतिष्ठान पुरस्कार' देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नाटिका, उठा राष्ट्रवीर हो, देश रंगीला, मेरा देश, यह देश है वीर जवानों का, जिंदगी मौत ना बन जाए संभालो यारो, ओ देश मेरे तेरी शान पे सदके हे देशभक्तीपर गीत सादर केले. त्यानंतर श्रेयस पाटील, श्रेयश चप्पळगे, रिया बारड, सार्थक चिंचोळी, श्रेयश हरसुरे, साईकिरण कैंचगुंडी, अवनी अलदी, अंकिता कस्तुरी, सिद्धिविनायक कुंभार, ओंकार मंगरुळे, स्नेहा म्हेत्रे या विद्यार्थ्यांची भाषणे झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवानंद पुजारी यांनी केले.

# राज्यात पावसाचा जोर पुन्हा एकदा वाढणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राज्यात पावसाचा जोर ओसरला आहे. मात्र, पुन्हा एकदा राज्याच्या काही भागांमध्ये आज पावसाचा जोर पुन्हा एकदा वाढणर असल्याचा अंदाज आहे. राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये पावसाचा यलो अलर्ट देण्यात आला आहे. तर, इतर ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज वर्तण्यात आला आहे.

काही ठिकाणी पावसासह आणखी एका संकटाचा इशारा देण्यात आला आहे. नांदेड, लातूर, धाराशिव, चंद्रपूर, गडचिरोली, वाशिम, यवतमाळ या जिल्ह्यांमध्ये यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर सिंधुदूर्ग, कोल्हापूर, सांगली, सोलापूर, संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली या जिल्ह्यांमध्येही हलक्या पावसासह सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे पुण्यामध्ये आज ढगाळ आकाश राहून हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

जुलैला अखेरीस झालेल्या मुसळदार पावसाने ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीपासून विश्रांती घेतली आहे. मुंबईसह उपनगरात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी बरसत आहेत. पाऊस ओसरल्याने पुन्हा एकदा उकाडा जाणवू लागला आहे. दरम्यान, पुढील काही दिवस मुंबई तसेच ठाणे, पालघर भागात हलक्या सरींचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. शहर परिसरात ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला काही भागात पाऊस झाला. मात्र, त्यानंतर पावसाची दडी मारली आहे. काही भागात अधूनमधून पाऊस कोसळत आहेत. परंतु ऑगस्ट महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मुसळधार पाऊस झालेला नाही. त्यामुळे मुंबईकरांना उकाडा सहन करावा लागत आहे.

दरम्यान, पुढील काही दिवस मुंबईत अशीच स्थिती कायम असणार आहे. मात्र काही भागात हलक्या सरी कोसळतील. या काळात संपूर्ण दिवसभर ढगाळ वातावरण राहील. काही भागात पाऊस होईल, तर काही भागात कोरडे वातावरण असेल असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# स्वाभिमानी संघर्ष ग्रुप शिंदेवाडी यांच्याकडून जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी यांना स्पोर्ट किटचे वाटप

**माढा (कटूसत्य वृत्त):-** भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्त शाळेतील मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी व खेळाचे महत्व आधोरेखित करण्यासाठी शिंदेवाडी ता.माढा येथील स्वाभिमानी संघर्ष ग्रुप शिंदेवाडी यांच्याकडून जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी यांना स्पोर्ट किटचे वाटप करण्यात आले.



यावेळी शाळेचे मुख्याध्यापक माने, कवडे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नवनाथ शिंदे, नागनाथ शिंदे, श्रीहरी सावंत, संदीप शिंदे,रामभाऊ शिंदे, बापू शिंदे, शिवराज शिंदे, सुनील परांडे, विठ्ठल शिंदे, अमोल देवकुळे, सुनिल सावंत, बाळू सावंत, रामा ढेरे, धनाजी शिंदे, संजय भांगे, रोहित साळुंखे, रोहन शिंदे, पदमकुमार शिंदे सह ग्रामस्थ गावातील महिला आदी उपस्थित होते.

# सुस्ते येथे खेळ पैठणीचा कार्यक्रम उत्साहात संपन्न



**पंढरपूर(कटूसत्य वृत्त):-** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीत आबा पाटील यांच्या संकल्पनेतून विठ्ठल प्रतिष्ठान यांच्यावतीने नागपंचमी व रक्षाबंधनानिमित्त सुप्रसिद्ध निवेदिका मोनिका जाजू यांच्या निवेदनाखाली खेळ पैठणीचा कार्यक्रम सुस्ते येथे उत्साहात संपन्न झाला..

दैनंदिन जीवनात व्यस्त असलेल्या महिलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलविण्याचा हेतुने कार्यक्रम घेत आहे. महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा, त्यांनाही आनंदाचे क्षण वेचता यावेत याच अनुषंगाने खेळ पैठणीचा कार्यक्रम घेत असल्याचे चेअरमन अभिजीत पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले. सदर कार्यक्रमामध्ये विजयी झालेल्या महिलांचे हार्दिक अभिनंदन करून त्यांना पारितोषिकांचे वाटप करण्यात आले. यावेळी विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रामदास बापू चव्हाण, पांडुरंग कदम, बाळासाहेब सालविठ्ठल, अनिल काका घाडगे, सरपंच विशाल कसबे, दिलीप दाजी रणदिवे, समाधान चव्हाण, उपसरपंच स्नेहा बोबडे, ग्रामपंचायत सदस्य राणी चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य मनीषा कोळी, ग्रामपंचायत सदस्य विष्णू तात्या गावडे, राजेंद्र बोबडे, विठ्ठल कारखान्याचे संचालक विठ्ठल रणदिवे, परमेश्वर कांबळे, अजित मुलाणी, शरद लोकरे, अंनता चव्हाण, कुमार वाघमोडे, अर्चना चव्हाण, सारिका चव्हाण तसेच या कार्यक्रमासाठी अथक परिश्रम घेतलेले डीव्हीपी पीपल बँकेचे संचालक अनिल यादव, तानाजी सालविठ्ठल, शंकर सुर्वे, तुषार बोबडे, नितीन गावडे, महेश सालविठ्ठल, संतोष साठे, पंकज चव्हाण, बालाजी फुगारे, विशाल फरतडे, श्रीनिवास चव्हाण, अविनाश नागटिळक यांसह आदी मान्यवर उपस्थित होते.

# जयहिंद विद्यालयात स्वातंत्र्य दिन व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न



**कसबे तडवळे.(कटूसत्य वृत्त):-** धाराशिव तालुक्यातील कसबे तडवळे येथील जयहिंद विद्यालयात 78 वा स्वातंत्र्य दिन अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.विद्यालयाचे मुख्याध्यापक गाढवे आर. डी. यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले .यानंतर क.तडवळे गावातून जनजागृती प्रभातफेरी काढण्यात आली .यानंतर प्रशालेच्या मैदानात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. सुरुवातीला विद्यालयातील लक्ष्मी कसबे,अल्फीया तांबोळी,सादिया तांबोळी, वृषाली भालेराव, कु. श्रद्धा चव्हाण, कु. प्रतीक्षा निकाळजे, चि. संस्कार जगदाळे,चि. उत्कर्ष धाबेकर यांनी भाषणे सादर केली. तसेच इ. 7 वी तील विद्यार्थांनींनी देशभक्तीपर गीत सादर केले. गावातील डॉ. सीमा कुरुळे , श्रीमंत शिवाजीराव निंबाळकर, सुभाष वळेकर,आबा शिंदे परिट यांच्यातर्फे एस.एस. सी. व एच.एस.सी.परीक्षेतील प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा तसेच प्राध्यापक पठाण आय. एल. यांच्याकडून एच. एस. सी. परीक्षेत द्वितीय क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थीनींचा व पालके एस.टी.यांच्याकडून इ. 5 वी पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्तीधारक 1 विद्यार्थी व इ. ८ वी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीधारक ७ विद्यार्थ्यांचा रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.तसेच दरवर्षी दंडवते यांच्याकडून सैनिकांसाठी देण्यात येणारा पुरस्कार यावर्षी सिद्धार्थ निकाळजे यांना देण्यात आला.

हा पुरस्कार त्यांचे मित्र जमाले यांनी स्विकारला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक गाढवे आर.डी. यांनी केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आर. डी.गाढवे होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठाकरे पी. के यांनी केले.कार्यक्रमाची सुरुवात व शेवट विद्यालयातील मुलींनी देशभक्तीपर गीत गाऊन केली.त्यासाठी सर्व महिला शिक्षिकांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी माजी मुख्याध्यापक लंगडे,दंडवते परिवार,अच्युत भालेराव, ग्रा.पं. सदस्य भालेराव,अशोक करंजकर व इतर मान्यवर उपस्थित होते.

हा कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

# स्वातंत्र्यदिनी तहसिल कार्यालय येथे ध्वजारोहण संपन्न



**पंढरपूर(कटूसत्य वृत्त):-** स्वातंत्र्याच्या 77 व्या वर्धापन दिनानिमित्त तहसिल कार्यालय येथे प्रांताधिकारी सचनि इथापे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसिलदार सचिन लंगुटे, अपर तहसिलदार तुषार शिंदे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, नायब तहसिलदार विजय कुमार जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.एकनाथ बोधले, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे यांच्यासह स्वातंत्र्य सैनिक, मान्यवर नागरिक, पदाधिकारी तसेच अधिकारी-कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते. यावेळी पंढरपूर पोलीस पथकाच्यावतीने मानवंदना देण्यात आली.

# ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालयात स्वातंत्र्य दिन साजरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारतीय स्वातंत्र्याचा 78 वा स्वातंत्र्य दिन ज्ञानदीप सार्वजनिक वाचनालय सोलापूर येथे उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. वाचनालयातील जेष्ठवाचक विठ्ठल पोळ यांचे शुभहस्ते ध्वजवंदन करण्यात आले. सर्वप्रथम राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले .त्यानंतर ध्वजवंदन होऊन राष्ट्रगीता नंतर अभिवादन करण्यात आले .सदर कार्यक्रमास वाचनालयाचे खजिनदार तेजुसिंग चव्हाण ,शंकर फकरे, सचिन माने, लवराळे ,सौ सारिका माडीकर, प्रभाकर फुलमाळी, अशोक कडदास, शिवकांता वास्ते, हर्ष मोरे ,शुभम कुंभार, वीरेंद्र प्रसाद माडीकर, विशाल बासुतकर यांच्यासह परिसरातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक सारिका मोरे यांनी केले तर आभार सौ सारिका माडीकर यांनी मानले.